# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक १८/०२/२०२२

### “ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या गॅस रिफिलींग करुन गॅसची चोरी करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई केलेबाबत ”

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक १७/०२/२०२२ रोजी चिखली पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या गॅस रिफिलींग करुन गॅसची चोरी करणाऱ्या इसमांवर कारवाई कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १७/०२/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चिखली पोलीस स्टेशन हद्दीत गंगारामनगर, जाधववाडी, चिखली, पुणे येथील रिव्हर रेसीडन्सी ते रामकृष्ण हरी चौकाकडे जाणारे रोडलगत असलेल्या जय मल्हार गॅस या पत्र्याचे दुकानाचे पाठीमागील पत्र्याचे रुममध्ये इसम नामे इंद्रशेखर पंढारे हा गॅससारख्या ज्वलनशिल पदार्थाबाबत पुरेशी काळजी न घेता धोकादायक पध्दतीने भारत गॅस एजन्सी व एचपी गॅस एजन्सीच्या घरगुती गॅसचे टाकीतुन छोट्या गॅस टाकीमध्ये गॅस रिफिलींग करुन गॅसची चोरी करीत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चिखली पोलीस हद्दीत सापळा रचुन १२:०० वाजता छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपींच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) ७,०३०/- रु रोख रक्कम.
२) १,७२,५४९/- रु किं चे गॅस सिलेंडर २४ लहान व ६१ मोठ्या अशा एकुण ८५ टाक्या.
३) २,४००/- रु गॅस चोरी करण्याचे साहित्य.
४) ४,५०,०००/- रु किं ची दोन वाहने.

------------------------------------

**असा एकुण ६,३१,९७९/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन आरोपी नामे १) इंद्रशेखर हनुमंतराव पंढारे वय ३० वर्षे रा. पुणेरी स्विटमार्टजवळ, डुडुळगांव, मोशी, पुणे (गॅस रिफिलींग करणारा मालक) २) लक्ष्मण मोहनराव म्हेत्रे वय २३ वर्षे रा. येणकी पो होनाली ता. उदगीर जि. लातूर (भारतगॅस शहिद शंकर गॅस एजन्सी चा कामगार/चालक तीन चाकी गाडी क्रमांक एमएच १४ सी डी १०९) ३) साईनाथ मारुती शिरसेकर वय १९ वर्षे रा. भानुदास आल्हाट यांच्या भाड्याचे रुममध्ये, अरुणनगर, मोशी, पुणे (नागेश्वर एचपी गॅस एजन्सी चा कामगार/चालक टेम्पो क्रमांक एमएच १४ डी.एम. ०४२१) यांचेकडे गॅस सिलेंडर टाक्या कोणाकडून आणल्या आहेत याबाबत अधिक चौकशी केली असता त्यांनी १) भारत गॅस एजन्सी शहिद शंकर गॅस एजन्सी, संभाजीनगर, घरकुल, चिखली, पुणे २) नागेश्वर एचपी गॅस एजन्सी, मोशी, पुणे या गॅस एजन्सी मधुन गॅस सिलेंडर टाक्या आणल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणुन त्यांचेविरुध्द चिखली पोलीस स्टेशन येथे गुरनं ७६/२०२२ भादंवि कलम ३७९, ४२०, २८५, ३४ सह जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७ सह एलपीजी (पुरवठा आणि वितरण नियमन) आदेश २००० चे कलम ३,४,५,६,७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास चिखली पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, वपोनि श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागातील सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि धैर्यशिल सोळंके, पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, संतोष बर्गे, नितीन लोंढे, भगवंता मुठे, अमोल साडेकर, राजेश कोकाटे, गणेश कारोटे, योगेश तिडके, वैष्णवी गावडे, संगिता जाधव यांनी केली आहे.


MH14DM0421
Feb 17, 2022, 23:44